## BOMBAY ACT No. XXXIX OF 1957.

### AN ACT TO PROVIDE FOR THE ABOLITION OF WHIPPING AS A PUNISHMENT IN THE STATE OF BOMBAY.

## सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३९ वा.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राज्यपत्रांत" तारीख २८ माहे सप्टेंबर सन १९५७ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### मुंबई राज्यांत, शिक्षा म्हणून असलेली फटके मारण्याची शिक्षा रद्द करण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, शिक्षा म्हणून असलेली फटके मारण्याची शिक्षा रद्द करण्यासाठीं संसदनें फटके मारण्याची शिक्षा रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५ अधिनियमित केला आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई राज्यांत, शिक्षा म्हणून असलेली फटके मारण्याची शिक्षा रद्द करण्यासाठीं व त्या कारणाकरितां, मुंबईचा (निकडीच्या प्रसंगीं) फटके मारण्याचा अधिकार देण्याबाबत अधिनियम, १९४७, रद्द करण्यासाठीं आणि मुंबई वेश्याव्यवसाय प्रतिबंध अधिनियम, १९२३, तसेंच, तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ हा सौराष्ट्राचा प्रदेश वगळून राज्यांतील ज्या प्रदेशांस तो लागू आहे त्या प्रदेशांपुरता, आणखी सुधारण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे; (सन १९२३चा मुंबई अधिनियम ११ वा.)

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास मुंबईचा फटक्याची शिक्षा रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५७ असें म्हणावें. (लघु संज्ञा.)

२. मुंबईचा (निकडीच्या प्रसंगीं) फटके मारण्याचा अधिकार देण्याबाबत अधिनियम, १९४७ हा याद्वारें रद्द करण्यांत येत आहे. (सन १९४७चा मुंबई अधिनियम २७ वा रद्द करणें.)

३. मुंबई वेश्याव्यवसाय प्रतिबंध अधिनियम, १९२३ यांत,— (सन १९२३चा मुंबई अधिनियम ११ वा याचीं कलमें ५, ६, ७ व ८ यांची सुधारणा व कलम ८-अ गाळणें.)

(१) पुढीलपैकीं प्रत्येकांत, म्हणजे, कलम ५ चें पोट-कलम (१), कलमें ६ व ७ आणि कलम ८ चें पोट-कलम (१) यांतील "किंवा फटक्याची शिक्षा दिली पाहिजे किंवा सदरहू शिक्षांपैकीं कोणत्याहि दोन शिक्षा दिल्या पाहिजेत" या मजकुराऐवजीं "किंवा या दोन्ही शिक्षा होतील" हा मजकूर दाखल करावा ;

(२) कलम ८-अ गाळण्यांत यावें.

सन १८९४चा अधिनियम ९ वा याचीं कलमें ४६, ४७, ५० व ५१ यांची सुधारणा आणि कलम ५३ गाळणें.

४. तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ यांतील,—

(१) कलम ४६ मधील—

कंडिका (१२) गाळण्यांत यावी ; आणि परंतुकांतील " अगर फटके दिले जाण्यास " हे शब्द गाळण्यांत यावे;

(२) कलम ४७, पोट-कलम (१) याची कंडिका (४) गाळण्यांत यावी;

(३) कलम ५०, पोट-कलम (१) मधील " अगर फटके देण्याची शिक्षा " हे शब्द गाळण्यांत यावे;

(४) कलम ५१, पोट-कलम (२) यांतील " आणि फटक्यांची शिक्षा देण्यांत येईल त्या अपराधांच्या बाबतींत ", या शब्दांनीं सुरू होणारा व " हें सर्व लिहून ठेवलें पाहिजे " या शब्दांनीं संपणारा मजकूर गाळण्यांत यावा ;

(५) कलम ५३ गाळण्यांत यावें.

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.